


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



• वर्ष : ०३ • अंक : १३८ • पुणे • शनिवार, दि. ३१ जानेवारी २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313



सुषमा चोरडिया यांना पुरस्कार प्रदान 3



मासिक पाळीविषयी जनजागृती गरजेची 3

## ठळक बातम्या

### हुक्का पार्लरवर पोलिसांचा छापा

पुणे (आरंभ पर्व) : स्वारगेट परिसरातील हुक्का पार्लरवर पोलिसांनी छापा टाकून हुक्का सेवनासाठी वापरले जाणारे साहित्य जप्त केले आहे. याप्रकरणी हॉटेल व्यवस्थापकासह सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. लक्ष्मीनारायण चौकाजवळील मोदी प्लाझा इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील एल डिनेरो हॉटेलमध्ये अवैधरीत्या हुक्का पार्लर सुरू असल्याची माहिती स्वारगेट पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिस पथकाने छापा टाकला असता, हॉटेलचे शटर आतून बंद आढळून आले. वारंवार आवाज देऊनही प्रतिसाद न मिळाल्याने अग्निशामक दलाच्या मदतीने शटर उघडून आत प्रवेश केला. या छाप्यात ग्राहकांकडून रोख रक्कम घेऊन तंबाखूजन्य हुक्का पदार्थांचे सेवन केले जात असल्याचे आढळून आले. विविध प्रकारचे हुक्का पॉट, चिलीम, प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थ आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले.

### पुणेकरांची पाण्यासाठी धडपड

पुणे (आरंभ पर्व) : पुणे शहरातील मध्यवर्ती पेठ, सेनापती बापट रस्ता, सिंहगड रस्ता, धायरी यासह अनेक भागात कमी दाबाने व अपुरे पाणी आल्याने नागरिकांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागले. अनेक भागात शुक्रवारी (ता. ३०) सायंकाळनंतरही पाणी न आल्याने नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागले. पुणे महापालिकेने गुरुवारी (ता. २९) जलकेंद्राच्या ठिकाणी विद्युत व स्थापत्य विषयक देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी पाणी पुरवठा बंद ठेवला होता. शुक्रवारी सकाळी उशिरा व कमी दाबाने पाणी पुरवठा होईल असे सांगण्यात आले होते. मात्र, आज दुपार उलटून गेली तरीही पाणी पुरवठा सुरुळीत झाला नाही. गुरुवार पेठ, रविवार पेठ, शनिवार पेठ, शुक्रवार पेठ, बुधवार पेठ यासह अन्य भागात खूप कमी दाबाने पाणी पुरवठा झाला. महापालिकेकडून जेव्हा शहराचा पाणी पुरवठा बंद केला जातो, त्याच्या दुसऱ्या दिवशी कमी दाबाने पाणी येते. पण यावेळी दरवेळेपेक्षा खूप कमी दाबाने पाणी आले.

# महाराष्ट्रात सुनेत्रा 'पर्व'

## शपथविधीसाठी सुनेत्रा पवार मुंबईत : महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून घेणार शपथ



**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांचा शपथविधी आज संध्याकाळी ५ वाजता पार पडणार आहे. त्या महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री ठरतील. उपमुख्यमंत्री पदासोबतच सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी देखील निवड होण्याची शक्यता आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी त्यांची आज निवड केली जाईल. या शपथविधी सोहळ्यासाठी सुनेत्रा पवार आणि जय पवार बारामतीहून मुंबईत दाखल झाले आहेत. आज दुपारी २ वाजता विधानभवनातील कॅबिनेट सभागृहात राष्ट्रवादीच्या आमदार आणि खासदारांची महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत सुनेत्रा पवार यांच्या निवडीचा प्रस्ताव मांडला जाईल आणि त्यानंतर आमदारांच्या संमतीचे पत्र मुख्यमंत्री आणि राज्यपालांना दिले जाईल. सुनील तटकरे, प्रफुल पटेल, छगन भुजबळ आणि धनंजय मुंडे यांसारख्या प्रमुख नेत्यांनी या संदर्भात मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली आहे. राज्यपालांच्या संमतीनंतर लोकभवन येथे हा शपथविधी सोहळा पार पडणार आहे.

विधिमंडळ नेता निवडीसाठी आज होणाऱ्या बैठकीला विधानसभा आणि विधान परिषद या दोन्ही सदनांमधील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या आमदारांना बोलावण्यात येणार आहे. या बैठकीत सुनेत्रा पवार यांची विधिमंडळ नेतेपदी निवड केली जाणार आहे. ही निवड एकमताने होईल. परंतु, या बैठकीतच त्यांच्याकडे पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्षपदही सोपविले जाणार आहे. केंद्रीय कार्यकारिणीकडून त्यानंतर सोपस्कार पार पाडून घेतले जातील, अशी माहिती पक्षातील एका वरिष्ठ नेत्याने दिली.

### राष्ट्रवादीच्या निर्णयाला आमचे समर्थन : फडणवीस

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असेल किंवा अजित पवार यांचे कुटुंब असेल, याला आमचे पूर्ण समर्थन आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष जो काही निर्णय घेईल त्याच्या पाठीशी आम्ही राहू. मला राष्ट्रवादीच्या नेत्यांनी भेटून जे काही पर्याय आहेत त्याची माहिती दिली आहे. अजित पवार यांचे कुटुंब असेल किंवा राष्ट्रवादी पक्ष याला आमचा पाठिंबाच राहील. जी काही प्रक्रिया करायची आहे ती त्यांच्या पक्षांतर्गतचा विषय आहे.**

**महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा 28 जानेवारी रोजी विमान अपघातात मृत्यू झाला, त्या दिवशी पायलट सुमीत कपूर यांची ड्युटीच नव्हती. त्यांचा मित्र वाहतूक कोंडीत अडकल्यामुळे विमान कंपनीने सुमीत यांना ड्युटीवर जाण्याचे आदेश दिले, अशी माहिती समोर आली आहे. विमानाचे सारथ्य कॅप्टन सुमीत यांनी केले खरे; पण त्या विमानाचा दुर्दैवी अपघात झाला आणि त्यात अजित पवार यांच्यासह पाचजणांचा मृत्यू झाला.**

## गटनेतेपदी सोपान उर्फ काकासाहेब चव्हाण यांची निवड

### पुणे महानगरपालिकेमध्ये काकासाहेब चव्हाण यांच्या रूपाने राष्ट्रवादीकडे अनुभवी चेहरा



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहरातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे . पुणे महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाने गटनेतेपदी सोपान उर्फ काकासाहेब चव्हाण यांची निवड करण्यात आली आहे. ही निवड पक्ष संघटनात्मक बळकटीसाठी महत्त्वाची मानली जात आहे. प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी गटनेतेपदासाठी चव्हाण यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले असून त्याबाबतचे अधिकृत पत्र संबंधित पदाधिकाऱ्यांसह विभागीय आयुक्तांकडेही पाठविण्यात आले आहे. काकासाहेब चव्हाण हे पक्षातील अनुभवी व ज्येष्ठ नेते म्हणून ओळखले जातात. अगदी सुरुवातीला युवक काँग्रेसचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. त्यानंतर पुणे महानगरपालिकेमध्ये नगरसेवक म्हणून काम करताना विविध विकासकामांमध्ये पुढाकार घेतला होता. खडकवासला मतदारसंघाच्या बांधणीनंतर त्यांनी खडकवासला विधानसभा क्षेत्रात पक्ष संघटन मजबूत करण्यासाठीही महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे विधानसभा अध्यक्ष म्हणून त्यांनी कामगिरी केली आहे. पक्ष नेतृत्वाला त्यांच्या अनुभवाचा आणि संघटन कौशल्याचा फायदा होईल, या विश्वासातून त्यांची निवड झाल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

निवडीनंतर प्रतिक्रिया देताना चव्हाण यांनी पुणे शहराच्या सर्वांगीण विकासासाठी, नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी आणि पक्षाची ताकद वाढवण्यासाठी सक्रियपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. स्व. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या स्वप्नातील आदर्श पुणे घडवण्याचा संकल्प आम्ही करु. सत्ताधाऱ्यांकडून पुणेकरांच्या विकासासाठी जास्तीत जास्त प्रकारे निधी मिळवण्यासाठी प्रयत्न करू असेही त्यांनी यावेळी सांगितलं. पक्षाने दिलेल्या संधीबद्दल त्यांनी आभार मानले.




# पुणे शहरात पोलिस निरीक्षकांच्या बदल्या

### वरिष्ठ पदांवर सहा अधिकाऱ्यांची नेमणूक



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहर पोलिस दलातील २५ पोलिस निरीक्षकांच्या प्रशासकीय कारणास्तव अंतर्गत बदल्या करण्याचा आदेश पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला आहे. त्यामध्ये सहा पोलिस निरीक्षकांकडे पोलिस ठाण्यांच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षकपदाची जबाबदारी सोपविली आहे. तसेच, तीन सहाय्यक आयुक्तांसह गुन्हे शाखेतील पोलिस निरीक्षकांच्याही युनिटअंतर्गत बदल्या करण्यात आल्या आहेत.

जयंत राजूरकर (सहकारनगर पोलिस ठाणे ते वरिष्ठ पोलिस निरीक्षक समर्थ पोलिस ठाणे), राघवेंद्रसिंह क्षीरसागर (पोलिस निरीक्षक, कल्याण शाखा ते उत्तमनगर पोलिस ठाणे), विनय पाटणकर (नियंत्रण कक्ष ते वरिष्ठ निरीक्षक, सिंहगड रस्ता), मारुती पाटील (वाहतूक शाखा ते वरिष्ठ निरीक्षक येवलेवाडी), संतोष खेतमाळस (आर्थिक गुन्हे शाखा ते लष्कर), नंदकुमार गायकवाड (पर्वती ते वाघोली पोलिस ठाणे), मनीषा पाटील (मार्केट यार्ड ते लोहगाव पोलिस ठाणे), विश्वजीत जगताप (लोहगाव ते मार्केट यार्ड पोलिस ठाणे), राजेंद्र सहाणे (वाहतूक शाखा ते वरिष्ठ निरीक्षक, पर्वती), महेश बोळकोटगी (शिवाजीनगर ते वारजे माळवाडी पोलिस ठाणे), गिरीश दिघावकर (लष्कर ते वरिष्ठ निरीक्षक शिवाजीनगर), उमेश गित्ते (समर्थ ते लक्ष्मीनगर पोलिस ठाणे), मोहन खंदारे (उत्तमनगर ते आर्थिक गुन्हे शाखा), दिलीप दाईंगडे (सिंहगड रस्ता ते गुन्हे शाखा), अमर काळंगे (येवलेवाडी ते शिवाजीनगर- गुन्हे), युवराज हांडे (वाघोली ते गुन्हे शाखा), विश्वजीत काईंगडे (वारजे माळवाडी ते खंडणी विरोधी पथक), माया देवरे (गुन्हे शाखा ते वाहतूक शाखा), मनोजकुमार लोंढे (गुन्हे शाखा ते सहकारनगर पोलिस- गुन्हे), नीलेश बडाख (वारजे माळवाडी ते मुंढवा पोलिस ठाणे), पल्लवी मेहेर (येरवडा ते वाघोली पोलिस ठाणे), नितीन भोयर (सिंहगड रस्ता ते विशेष शाखा), जितेंद्र कदम (गुन्हे शाखा ते कल्याण शाखा), सुनीता नवले (मार्केट यार्ड ते येवलेवाडी पोलिस ठाणे), धनंजय पिंगळे (शिवाजीनगर ते वाहतूक शाखा).

सहाय्यक पोलिस आयुक्तांच्या बदल्या- चंद्रकांत भोसले (वाहतूक शाखा ते विश्रामबाग विभाग), सुजाता तानवडे (वाहतूक शाखा ते कोथरूड विभाग) आणि डॉ. शीतल जानवे (कोथरूड विभाग ते आस्थापना पुणे शहर).

### नवले पुलावर ३ ते ५ दरम्यान लेन बंद



- **कात्रज जुना बोगदा आणि सेवा रस्त्यांचा वापर करण्याचे आवाहन**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे-सातारा महामार्गावरील कात्रज नवीन बोगदा ते नवले पूल दरम्यान स्पीड नियंत्रण कॅमेरे गॅन्ट्री बसविण्यासाठी तीन ते पाच फेब्रुवारी या कालावधीत सकाळी सहा ते आठ वाजेपर्यंत (दोन तास) साताराकडून मुंबईकडे जाणारी वाहतूक बंद करण्यात येणार आहे. या दरम्यान नागरिकांनी कात्रज जुना बोगदा आणि सेवा रस्त्यांचा वापर करावा, असे आवाहन भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण कार्यालयाच्या प्रकल्प संचालकांनी केले आहे.



# जिओ-बीपीच्या 'ॲक्टिव्ह टेक्नॉलॉजी' पेट्रोलचे अनावरण

## अतिरिक्त खर्चाशिवाय दरवर्षी १०० किमी अधिक ड्रायव्हिंगचा लाभ



**गोवा (दै. आरंभ पर्व)**

पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्री मा. श्री. हरदीप सिंग पुरी यांच्या हस्ते आज गोवा येथे सुरू असलेल्या इंडिया एनर्जी वीक 2026 दरम्यान जिओ-बीपीच्या क्रांतिकारी 'ॲक्टिव्ह टेक्नॉलॉजी' पेट्रोलचे अनावरण करण्यात आले. रिलायन्स इंडस्ट्रीज आणि बीपी यांच्या संयुक्त उपक्रमातील रिलायन्स बीपी मोबिलिटी लिमिटेड (RBML) चा कार्यरत ब्रँड जिओ-बीपी यांनी सादर केलेले हे प्रगत पेट्रोल इंजिनमधील महत्त्वाच्या भागांवर साचलेला चिकट मळ सक्रियपणे स्वच्छ करते.

### ग्राहकांसाठी ठळक फायदे

- इंजिनच्या नाजूक भागांवर साचलेला मळ प्रभावीपणे काढून टाकते
- इंजिन अधिक सुरळीत, विश्वासार्ह व दीर्घकाळ स्वच्छ राहण्यास मदत
- भारतीय दुचाकी व चारचाकी वापरकर्त्यांसाठी, अतिरिक्त खर्च न करता दरवर्षी 100 किमी पर्यंत जास्त ड्रायव्हिंग

परिणामी इंजिनची कार्यक्षमता पूर्ववत होते, संरक्षण वाढते आणि नियमित पेट्रोलच्या तुलनेत वाहनचालकांना दरवर्षी 100 किमी पर्यंत अधिक अंतर पार करण्याचा लाभ मिळतो — तोही कोणत्याही अतिरिक्त किमतीशिवाय.

बीपीच्या 100 वर्षांहून अधिक जागतिक इंधन संशोधन अनुभवावर आधारित, जिओ-बीपीच्या 'ॲक्टिव्ह टेक्नॉलॉजी' पेट्रोलचा विकास आणि प्रमाणीकरण उद्योग-मानक चाचण्या तसेच भारतीय इंजिन परिस्थितीनुसार सानुकूल पद्धती वापरून करण्यात आले आहे.

वास्तविक परिस्थितीत या पेट्रोलची स्वच्छता क्षमता सिद्ध करण्यासाठी कोईम्बतूर येथील टेस्ट ट्रॅकवर एका मोटरसायकलची 4,000 किमीहून अधिक अंतरासाठी चाचणी घेण्यात आली. या चाचणीचे थेट प्रात्यक्षिक इंडिया एनर्जी वीकमध्ये उपस्थित प्रेक्षकांसमोर सादर करण्यात आले.जिओ-बीपीचे अध्यक्ष सार्थक बेहुरिया म्हणाले, "भारतीय वाहनचालकांना सुरळीत इंजिन, जास्त विश्वासार्हता, कमी देखभाल खर्च आणि अधिक मायलेज हवे असते. 'ॲक्टिव्ह टेक्नॉलॉजी' पेट्रोल हे गाडी चालू असतानाच इंजिन स्वच्छ करते, ज्यामुळे हानिकारक मळाचे दुष्परिणाम कमी होतात. उच्च-कार्यक्षमतेची इंजिन स्वच्छता ही आता एक मानक वैशिष्ट्य बनवून, प्रगत इंधन तंत्रज्ञान सर्वांसाठी उपलब्ध करणे हे आमचे ध्येय आहे."

जिओ-बीपीचे CEO अक्षय वाधवा म्हणाले, "इंडिया एनर्जी वीक 2026 मध्ये आम्ही दोन मोटरसायकल्सचे थेट प्रात्यक्षिक सादर केले आहे—एक 'ॲक्टिव्ह टेक्नॉलॉजी' पेट्रोलवर आणि दुसरी सामान्य पेट्रोलवर. प्रगत बोरोस्कोप इमेजिंगद्वारे स्वच्छतेतील स्पष्ट फरक दिसून येतो. पाच वर्षांच्या संशोधनातून विकसित झालेले हे पेट्रोल इंधन कार्यक्षमता वाढवतेच, शिवाय देखभाल खर्चही कमी करते."

इंडिया एनर्जी वीकमधील आपल्या स्टँडवर जिओ-बीपीने इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग सोल्युशन्स, एव्हिएशन टर्बाइन फ्युएल (ATF), घरपोच डिझेल सेवा तसेच सध्याच्या व भविष्यासाठी सज्ज विविध वायू इंधनांचा व्यापक पोर्टफोलिओ सादर केला. यामुळे कमी कार्बन उत्सर्जन असलेल्या मोबिलिटी सोल्युशन्सद्वारे भारतीय बाजारात अधिक मूल्य देण्याच्या जिओ-बीपीच्या दृष्टिकोनाला बळकटी मिळते.

## दुखापत होऊनही अभिनयाची जिद्द काही सोडली नाही

- अभिनेत्री स्नेहा बालपांडेचं कलाकार मंडळींकडूनही होतंय कौतुक



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

रंगभूमी आणि अभिनयक्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारी अभिनेत्री स्नेहा बालपांडे सध्या चर्चेत आहे. The Rebels ही तिची ओळख केवळ नावापुरती मर्यादित नसून, ती तिच्या अभिनयशैलीतून सातत्याने प्रकट होताना दिसते. नाटकांच्या सरावापासून प्रयोगांपर्यंतचा तिचा प्रवास संघर्ष, शिस्त आणि सातत्य यांचा संगम नेहमीच मनाला भावणारा आहे. धर्म, समाजव्यवस्था आणि मानवी भावना यांवर भाष्य करणाऱ्या भूमिका ती अत्यंत प्रामाणिकपणे साकारते. वाटेत आलेले दुःख आणि आव्हाने तिने कधीही दुर्बलता न मानता, त्यांना आपल्या अभिनयाची ताकद बनवत पेलली आहेत. the rebels या नाटकाच्या प्रॅक्टिस दरम्यान स्नेहाच्या पायाला दुखापत झाली. असं असतानाही पुण्यात होणाऱ्या मंच उत्सव २०२६ नमस्ते थिएटर द्वारे आयोजित फिल्म फेस्टिव्हलला स्नेहाने the rebels या नाटकाद्वारे मंच गाजवला.

## मातृत्व आरोग्याबाबत जनजागृतीला चालना

- जननी यात्रेला महिलांचा मोठा प्रतिसाद

**पुणे-महेश वरवटे (दै. आरंभ पर्व)**

महिलांचे आरोग्य, सुरक्षित मातृत्व आणि नवजात बालकांच्या काळजीविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या जननी यात्रा उपक्रमाला पुणे शहर व परिसरात मोठा प्रतिसाद मिळत आहे. या यात्रेमार्फत गर्भवती महिला, नवमाता आणि कुटुंबीयांना आरोग्यविषयक महत्त्वपूर्ण माहिती देण्यात येत आहे. जननी यात्रेदरम्यान तज्ज्ञ डॉक्टर, आरोग्य सेविका आणि कार्यकर्त्यांच्या माध्यमातून महिलांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात येत असून रक्तदाब, हिमोग्लोबिन, वजन आदी तपासण्या केल्या जात आहेत. तसेच संतुलित आहार, नियमित तपासणी, लसीकरणाचे




महत्त्व आणि सुरक्षित प्रसूती याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येत आहे. ग्रामीण व शहरी भागातील अनेक महिलांनी या उपक्रमाचा लाभ घेतला असून आरोग्याबाबत जागरूकता वाढल्याची भावना व्यक्त केली आहे. अनेक महिलांना वेळेअभावी किंवा माहितीच्या अभावामुळे आरोग्यसेवांपासून वंचित राहावे लागत होते. मात्र या जननी यात्रेमुळे आरोग्य सेवा थेट त्यांच्या दारापर्यंत पोहोचत असल्याचे दिसून येत आहे. आरोग्य विभाग व स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने राबवण्यात येणाऱ्या या उपक्रमामुळे माता मृत्यूदर कमी करण्यास मदत होणार असून महिलांचे आरोग्य सुदृढ राखण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरत असल्याचे आयोजकांनी सांगितले. पुढील टप्प्यात अधिक भागांमध्ये जननी यात्रा राबवण्यात येणार असून जास्तीत जास्त महिलांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

## निखिल कोष्टी आणि आचल चव्हाणचं "काजळवाली" गाणं प्रदर्शित

- जळगावच्या सुंदरश्या गावात झालं गाण्याचं चित्रीकरण!




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जळगावच्या मातीतला मराठमोळा अभिनेता निखिल कोष्टी मराठी संगीत इंडस्ट्रीमध्ये आपलं स्वतःच स्थान निर्माण करू पाहत आहे, त्याच्या "नाद तुझा लागला", "मामाच पत्र हरवलं" आणि "बाप्पा तुझी आस" या गाण्याच्या यशानंतर अभिनेता, गीतकार आणि निर्माता म्हणून त्याचं नवं "काजळवाली" हे गाणं प्रेक्षकांच्या भेटीस आलं आहे. अभिनेता निखिल कोष्टी आणि अभिनेत्री आचल चव्हाण यांनी या गाण्यात काम केलं आहे. तर या गाण्याचे दिग्दर्शन प्रेम बडगुजर यांनी केलं आहे. हे गाण मयूर मोरेने गायलं असून गाण्याच संगीत विजय धुमाळ याने केल आहे. तिच्या स्वप्नांना पंख देण्यासाठी तो स्वतःची स्वप्न विसरला पण जेव्हा ती वकील होऊन गावात परतली तेव्हा खऱ्या अर्थाने त्याच्या कष्टाच फळ मिळालं. एक सुंदर संदेश देत एका गावातली अनोखी प्रेमकथा या गाण्यामधून मांडली आहे. सध्या या गाण्याला सोशल मीडियावर तुफान प्रतिसाद मिळत आहे. निखिल कोष्टी या गाण्याच्या प्रोसेसविषयी सांगतात,"मी मूळचा जळगावचा आहे. मला लहानपणापासूनच संगीताची खूप आवड आहे. माझ्या "नाद तुझा लागला", "मामाचं पत्र हरवलं" आणि "बाप्पा तुझी आस" या गाण्याला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. त्यामुळे मी काजळवाली हे गाणं घेऊन आलो आहे. आणि हे गाणं ही प्रेक्षकांना आवडत आहे. या गाण्याची गंमत अशी की मी २ वर्षापूर्वी एका कार्यक्रमाला गेलेलो तेव्हा मी तिथे एका सुंदर मुलीला पाहील. तिने डोळ्यात काजळ लावल्यामुळे ती अधिक सुंदर दिसत होती. त्यावरून मला या गाण्याच्या ओळी सुचल्या आणि मी ठरवलं आताच्या जेन झी यूथला साजेस अस गाण आपण बनवायचं. तुम्हाला हे गाण आवडलं असेल तर आम्हाला नक्की सांगा. माझ्या सर्व गाण्यांवर प्रेक्षकांनी भरभरून प्रेम करावं अशी मी आशा व्यक्त करतो."

दिग्दर्शक प्रेम बडगुजर गाण्याच्या चित्रीकरणाविषयी सांगतात, "जेव्हा निखिलने मला हे गाण शूट करण्यासाठी विचारलं तेव्हा मी ठरवलं की हे गाण थोड गावरान स्टाइलने शूट करायचं. आम्ही या गाण्याचं शूट जळगावमधील एका सुंदर गावात करायचं ठरवलं. गावात रखरखत्या उन्हात गाण्याच्या टीमने आणि कलाकारांनी गाण्याच शूट केलं. सोशल मीडियावर गाण्याला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. ते पाहून समाधान मिळत आहे."

## अनुव जैनने पुण्यात दिला आनंददायी अनुभव

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



पुणे शहराने एका भावनिक आणि आठवणींनी भरलेल्या संध्याकाळी संगीतप्रेमींना आनंदी केले, जेंव्हा गायक-गीतकार अनुव जैन यांनी त्यांच्या 'दस्तखत' वर्ल्ड टूरच्या भारत टप्प्यात पुण्यातील प्रेक्षकांसमोर प्रस्तुती दिली. टीम इनोव्हेशन आणि ट्रायबव्हाइब एंटरटेनमेंटने आयोजित आणि प्रचार केलेल्या, आणि पुण्यात हाऊस ऑफ मॅकडॉवेल्स सोडा यारी जॅमच्या माध्यमातून सादर केलेल्या या शोमध्ये हजारो संगीतप्रेमी आणि चाहते एकत्र आले, ज्यांनी जवळीक अनुभवत, मनाला स्पर्श करणारी लाईव्ह परफॉर्मन्स पाहिली आणि अनुव जैनच्या आतापर्यंतच्या सर्वात महत्वाकांक्षी संगीत प्रवासाची सुरुवात झाली. अनुव जैन स्टेजवर येताच संपूर्ण वातावरण भावनिक आणि अंतर्मुख होऊन गेले. त्यांच्या साध्या आणि भावपूर्ण सादरीकरणाच्या शैलीत, त्यांनी 'बारीशें', 'अलग आसमान', 'हुस्न', 'जो तुम मेरे हो', 'अफसोस' आणि 'अर्ज किया है' यांसारखी चाहत्यांची आवडती गाणी गायली. प्रत्येक सादरीकरणावर प्रेक्षकांनी भावपूर्ण स्वरात साथ दिली.

## थोडक्यात पण महत्वाचे



### ग्राहकांसाठी उपजीविका निर्माण करणारा एक कार्यक्रम

**पुणे (आरंभ पर्व) :** भारत सरकार आणि विमा नियामक यांच्या '२०४७ पर्यंत सर्वांसाठी विमा' या दृष्टिकोनाशी सुसंगत राहून, वनसर्कल इन्शुरन्स ब्रोकर्स प्रायव्हेट लिमिटेड 'पॉइंट ऑफ सेल्स पर्सन' (PoSP) यांचे एक नेटवर्क तयार करत आहे, ज्यांना विविध विमा उत्पादनांवर सल्ला आणि उपाय प्रदान करण्यासाठी ओळखले जाईल, प्रशिक्षित केले जाईल आणि प्रमाणित केले जाईल. 'वनसर्कल चॅम्पियन'™ म्हणून ओळखले जाणारे हे PoSP, ग्राहकांच्या दारात विमा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी, पुणे विभागापासून सुरुवात करून, शहरे आणि ग्रामीण भागांमध्ये तैनात केले जातील. मुंबईस्थित मुख्यालय असलेली जीवन आणि सर्वसाधारण विम्यासाठीची डायरेक्ट ब्रोकर कंपनी, वनसर्कल इन्शुरन्स ब्रोकर्स, सुरुवातीला ट्रक आणि कार विम्याच्या नूतनीकरणावर लक्ष केंद्रित करेल. वाहनांची संख्या वेगाने वाढत असल्यामुळे या क्षेत्रात विमा पोहोच आणखी वाढवता येऊ शकतो. स्थानिक व्यक्तींना ओळखून आणि त्यांना प्रशिक्षण देऊन, विविध विमा कंपन्यांकडून ग्राहकांना गरजेनुसार सल्ला आणि संबंधित पर्यायांची तुलना उपलब्ध करून देण्याद्वारे, कंपनी एक सर्वसमावेशक आणि परिणाम-केंद्रित उपक्रम तयार करण्याचे ध्येय बाळगते. ग्राहक त्यांच्या आवडीची पॉलिसी निवडू शकतात आणि वनसर्कल चॅम्पियनच्या मदतीने आपल्या मोबाईल फोनवरून थेट विमा कंपनीला प्रीमियम भरू शकतात.

### 'अब होगा हिसाब' मोफत स्ट्रीम होणार, फक्त ॲमेझॉन एमएक्स प्लेअरवर




**मुंबई (आरंभ पर्व) :** ॲमेझॉनची मोफत व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवा असलेल्या ॲमेझॉन एमएक्स प्लेअरने 'अब होगा हिसाब' या आगामी मालिकेची घोषणा केली आहे. पंजाबमध्ये घडणारी ही कथा महत्त्वाकांक्षा, बंधुभाव आणि स्थलांतराच्या ओढीवर आधारित आहे. खऱ्या घटनांपासून प्रेरित असलेली ही मालिका बॉबी आणि बंटी मनोचा या दोन भावांच्या आयुष्याभोवती फिरते. एक धक्कादायक घटना त्यांच्या आयुष्याला कलाटणी देते आणि त्यांना सत्तेच्या, लालसेच्या आणि अस्तित्वाच्या संघर्षाने भरलेल्या धोकादायक जगात ओढून नेते. या प्रोमोमध्ये मालिकेच्या थरारक जगाची धडकी भरवणारी झलक पाहायला मिळते, जिथे सूड, वर्चस्व आणि नैतिक जबाबदारीचे ओझे या भावनांचा कल्लोळ पाहायला मिळतो. या टीझरमध्ये गोल्डी सेखों या निर्दय व्यक्तिरेखेत संजय कपूर दिसतात. समोरच्याला काही कल्पना येण्याआधीच त्याच्यावर हल्ला केला पाहिजे, अशी गोल्डीची धारणा आहे. शाहीर यांनी बॉबी मनोचा ही भूमिका साकारली आहे. बॉबी मनोचा भावनिक व शारीरिक पातळीवर कधीही कडेलोट होईल, अशा पातळीवर आहे. मौनी रॉयने कामना ही भूमिका साकरली आहे. कामना अत्यंत चलाख व प्रसंगावधानता असलेली व्यक्तिरेखा आहे. तिला सत्तेची खरी किंमत काय आहे, याची जाणीव आहे. 'गुनाहों का और कर्मों का... अब होगा हिसाब' या अंगावर शहारे आणणाऱ्या ओळीभोवती गुंफलेला हा प्रोमो अशा नैतिक संघर्षाची पार्श्वभूमी तयार करतो, जिथे निष्ठा ठिसूळ आहेत, मर्यादांचे सतत उल्लंघन होते आणि भूतकाळातील प्रत्येक कर्माचा हिशेब द्यावा लागतो.

### 'मानवी बांधकाम पर्यावरणा'वर चौथ्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**पुणे(आरंभ पर्व) :** महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या डॉ. भानूबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर वूमेन तर्फे (बीएनसीए) 'मानवी बांधकाम पर्यावरण आणि त्यापलीकडील पारंपरिक ज्ञान आणि शाश्वत भविष्य' (बिल्ट एनव्हायरमेंट ॲण्ड बियाँड 4.0: फ्रॉम ट्रॅडिशनल विज्डम टू रेझिलियंट फ्यूचर) या मालिकेतील चौथ्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन तीन आणि चार फेब्रूवारी 2026 रोजी ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात येत आहे. ही परिषद बीएनसीएचे प्राचार्य डॉ. अनुराग कश्यप यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आली आहे. ते म्हणाले की, या परिषदेच्या माध्यमातून विविध क्षेत्रातील व्यावसायिक, संशोधक आणि विद्यार्थ्यांना एकत्र आणून कल्पनांची देवाणघेवाण , ज्ञानाचे आदान प्रदान तसेच मानवी बांधकाम व त्यापलिकडील नव्या दृष्टिकांनांचा अभ्यास करण्याचा उद्देश आहे.

## इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेडने केली लेटर ऑफ इंटेंटवर स्वाक्षरी




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील अग्रगण्य राष्ट्रीय ऊर्जा कंपनी इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेडने विंग्स इंडिया २०२६ दरम्यान भारतातील सर्वात वेगाने वाढणारी विमान कंपनी अकासा एअरसोबत भविष्यात सस्टेनेबल एव्हिएशन फ्युएल(एसएएफ) पुरवठ्याचा शोध घेण्यासाठी लेटर ऑफ इंटेंट (एलओआय) वर स्वाक्षरी केली. या लेटर ऑफ इंटेंट अंतर्गत, एसएएफच्या संभाव्य पुरवठ्यामार्फत एअरलाइनच्या शाश्वततेच्या उद्दिष्टांना पाठिंबा देण्यासाठी दोन्ही कंपन्यांमध्ये सहकार्याचा एक आराखडा तयार करण्याचा प्रस्ताव आहे. एसएएफ हे हवाई प्रवासातून होणाऱ्या जीवनचक्रातील हरितगृह वायू उत्सर्जन कमी करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण उपाय आहे आणि विमान वाहतूक क्षेत्राच्या नेट-झिरो उत्सर्जनाच्या दिशेने होणाऱ्या संक्रमणामध्ये महत्त्वाची भूमिका बजावेल, अशी अपेक्षा आहे.

"हा एलओआय कमी-कार्बन इंधनांचा विस्तार करण्याच्या आणि आमच्या ग्राहकांना त्यांच्या ऊर्जा संक्रमणामध्ये सहाय्य करण्याच्या आमच्या बांधिलकीचे प्रतिबिंब आहे.इंधन उत्पादन,पुरवठा आणि लॉजिस्टिक्समधील आमच्या तज्ज्ञतेचा लाभ घेत, एसएएफ चा लवकरात लवकर वापर सुरू करण्यासाठी आम्ही अर्थपूर्ण भूमिका बजावण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे," असे इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेडचे कंट्री हेड (एव्हिएशन बिझनेस) शैलेश धर यांनी सांगितले. या एलओआय नुसार, दोन्ही कंपन्या संभाव्य एसएएफ पुरवठ्याचे प्रमाण, वितरण स्थळे आणि कालमर्यादा यांचे मूल्यमापन करण्यासोबतच मान्यताप्राप्त शाश्वत कच्चा माल आणि उत्पादन पद्धतींच्या वापरावरही संयुक्तपणे काम करतील.

## एअरटेलचा जागतिक स्तरावर ऐतिहासिक उपक्रम

- एअरटेलकडून ३६ कोटी भारतीय ग्राहकांना अडोबी एक्सप्रेस प्रीमियम मोफत मिळणार !
- एअरटेलच्या सर्व ग्राहकांसाठी ४ हजार किंमतीचे अडोबीचे ए-आय आधारित सुविधा उपलब्ध होत असल्याने आता डिझाईन्स तयार करणे सहज शक्य होणार.




**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

भारताची आघाडीची दूरसंचार सेवा पुरवठादार कंपनी म्हणून प्रसिद्ध असलेल्या भारती एअरटेलने आता आपल्या ग्राहकांसाठी खास सोय उपलब्ध करुन दिली आहे. एअरटेलने ३६ कोटी भारतीय ग्राहकांसाठी अडोबी एक्सप्रेस हे अत्याधुनिक एप आता उपलब्ध केले आहे. अडोबी एप्लिकेशन हे वापरण्यासाठी अतिशय सोप्पे आहे. शिवाय या एप्लिकेशनच्या मदतीने डिजीटल कामही जलदरित्या पूर्ण होते. त्यामुळे सोशल मिडीयाशी संबंधित कोणतेही डिजीटल काम करणे आता सहज शक्य होणार आहे.

भारती एअरटेल आणि अडोबी यांच्यात पहिल्यांदाच या विषयासंदर्भातील ऐतिहासिक करार झाला आहे. या भागीदारीतून एअरटेल आपल्या सर्व ग्राहकांना अडोबी एक्सप्रेस प्रीमियमची सुविधा मोफत उपलब्ध होणार आहे. याद्वारे एअरटेलचे ग्राहक सोशल मिडीया पोस्ट, मार्केटिंग संबंधित डिजीटल काम, छोटे व्हिडिओ आणि इतर कोणतेही डिझाइन अत्यंत कमी श्रमात करु शकतील. या एप्लिकेशच्या मदतीने होणारी सर्व कामे उच्च दर्ज्याची असतील. या एप्लिकेशनच्या सबस्क्रिप्शनची मूळ किंमत चार हजार रुपये आहे. मात्र एअरटेलच्या ग्राहकांसाठी प्रीमियम सबस्क्रिप्शन वर्षभरासाठी मोफत असेल. विविध सोयीसुविधांच्या उपलब्धतेमुळे डिझायनिंगचा कोणताही पूर्वानुभव नसलेल्या ग्राहकांनाही आपल्या कल्पकतेच्या बळावर व्यावसायिक दर्ज्याचे कंटेट तयार करता येतील.

अडोबी एक्सप्रेस प्रीमियमचे हे विशेष सबस्क्रिप्शन एअरटेलच्या सर्व ग्राहकांसाठी उपलब्ध असेल. मोबाईल, वाय-फाय आणि डीटीएच सेवा वापरणाऱ्या ग्राहकांना या एप्लिकेशनचा वापर करता येईल. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी ग्राहकांना फक्त एअरटेल थँक्स एपवर लॉग-इन करुन या सर्व सोयीसुविधांना लाभ घेता येईल. हे सबस्क्रिप्शन सुरु करण्यासाठी कोणत्याही क्रेडिट कार्डची आवश्यकता नाही.

या भागीदारीबद्दल भारती एअरटेलचे कनेक्टेड होम्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि मार्केटिंग संचालक सिद्धार्थ शर्मा यांनी आपले मत व्यक्त केले.

ते म्हणाले, "अत्याधुनिक एआय साधनांच्या माध्यमातून कोट्यावधी भारतीयांना सर्जनशीलता आणि नवकल्पनांसाठी सक्षम करण्याचा आमचा प्रयत्न आहे. स्वतःचा पहिल्यांदाच रिझ्युम बनवणारा विद्यार्थी असो वा आपल्या व्यवसायाचे पोस्टर डिझाइन करणारा छोटा उद्योजक किंवा फॉलोअर्ससाठी व्हिडिओ एडीट करणारा एखादा क्रिएटर, या एअरटेलच्या सर्व ग्राहकांना स्वतःच्या अभिव्यक्तीसाठी आवश्यक साधने पुरवणे हा आमचा उद्देश आहे. अडोबी एक्सप्रेसमुळे आता जागतिक दर्ज्याची सर्जनशील साधने ही केवळ चैनीची वस्तू म्हणून मर्यादित न राहता प्रत्येक भारतीयासाठी सहज उपलब्ध होणारे वास्तव ठरत आहे."

अडोबीचे डिजीटल मीडिया विभागाचे अध्यक्ष डेव्हिड वाधवानी यांनाही या भागीदारीविषयी माहिती दिली. ते म्हणाले, "आम्ही अडोबी एक्सप्रेस या अत्यंत सोप्या आणि अष्टपैलू एप्लिकेशनच्या माध्यमातून प्रत्येकाला आपली स्वतंत्र ओळख निर्माण करण्यासाठी सक्षम करण्यास कटिबद्ध आहोत. एअरटेलसोबत भागीदारी करुन आम्ही भारतातील लाखो लोकांना अडोबी एक्सप्रेस प्रीमियमची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी अत्यंत उत्सुक आहोत.

या उपक्रमामुळे भारतातील गतिमान क्रिएटर इकॉनॉमीला (निर्मिती क्षेत्राला) मोठी चालना मिळेल. लोकांना आपले करिअर घडवण्यासाठी, स्वतःचा व्यवसाय वाढवण्यासाठी किंवा आपल्या आवडीच्या गोष्टींना प्रोत्साहन देण्यासाठी उच्च दर्ज्याचे कंटेंट आता सहजरित्या तयार करता येतील."






# दैनिक आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

शनिवार, दि. ३१ जानेवारी २०२६









## सुषमा चोरडिया यांना ‘नाट्यशारदा मंदाश्री स्त्रीशक्ती पुरस्कार’ प्रदान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शिक्षण, साहित्य, कला आणि समाजसेवा या चारही क्षेत्रांत अतुलनीय योगदान देणाऱ्या सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या उपाध्यक्षा सुषमा संजय चोरडिया यांना 'नाट्यशारदा मंदाश्री स्त्रीशक्ती पुरस्कार' प्रदान करण्यात आला. तितिक्षा इंटरनॅशनलच्या वतीने नुकतेच तितिक्षा कलासाहित्य (रौप्य महोत्सवी) संमेलन आणि दशकपूर्ती सोहळा नुकताच आयोजिला होता. त्यामध्ये हा प्रतिष्ठेचा सन्मान देऊन चोरडिया यांचा गौरव करण्यात आला. समाजाप्रती असलेले त्यांचे अमूल्य योगदान आणि महिला सक्षमीकरणासाठी त्यांनी केलेले कार्य विचारात घेऊन त्यांना या पुरस्काराने गौरविण्यात आले. पद्मश्री उदय देशपांडे व पद्मश्री गिरीश प्रभुणे यांच्या हस्ते झाले. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. महामंडलेश्वर कृष्णदेवगिरी महाराज, सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई, गायक नंदेश उमप, प्रिया दामले, चंद्रकांत कुलकर्णी (साहित्य व कला विभाग), अमित सिंह (संपादक, न्यायाधिकरण), पोलीस उपयुक्त गणेश जोशी, बाळ पुजारे, क्षमा वैद्य, सुजित दातार, योगेश सुपेकर आणि इतर अनेक मान्यवर उपस्थित होते.



"शिक्षण, साहित्य, कला आणि सामाजिक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा प्रकाश पसरवणाऱ्या सुषमा चोरडिया म्हणजे एक 'बहुआयामी' व्यक्तिमत्त्व आहे. केवळ विचारांनीच नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीनेही त्यांनी समाजात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांना मिळालेला हा बहुमान त्यांच्या आजवरच्या निस्पृह सेवेची आणि धडपडीची पोचपावतीच आहे," अशा शब्दांत मान्यवरांनी कौतुक केले.

"कार्यक्षम आणि आदर्शवादी नेतृत्वाचा सन्मान करून त्यांच्या सामाजिक प्रभावाला व्यापक व्यासपीठ मिळवून देणे, हे 'तितिक्षा'चे मुख्य ध्येय आहे. सुषमा चोरडिया यांनी साहित्य आणि कलेच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाचा जपलेला वारसा प्रेरणादायी आहे. त्या केवळ प्रशासकीय जबाबदारीच सांभाळत नाहीत, तर शैक्षणिक क्रांतीत त्या अग्रभागी आहेत. त्यांचे कार्य समाजाला सकारात्मक ऊर्जा देणारे आहे. हा सन्मान म्हणजे त्यांच्या आजवरच्या निस्पृह सेवेचा, कष्टांचा आणि त्यांच्या ध्येयवादी नेतृत्वाचा झालेला यथोचित गौरव आहे," असे प्रास्ताविकात नमूद करण्यात आले.

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या सोबतीने सुषमा चोरडिया यांनी 'सूर्यदत्त'च्या माध्यमातून शिक्षणाचा परीघ तयार केला असून, 'दर्जेदार शिक्षण' आणि 'सामाजिक जाणीव' यांचा संगम घातला आहे. समाजातील वंचित आणि गरजू विद्यार्थ्यांसाठी त्यांनी शिक्षणाची दारे खऱ्या अर्थाने खुली केली आहेत. मूल्याधिष्ठित पिढी घडवतानाच समाजाला नवी दिशा देण्याचे मोठे कार्य त्यांच्या मार्गदर्शनाखाली आज आकाराला येत आहे. शिक्षणासह महिला सक्षमीकरणासाठी सूर्यदत्त विमेन एंटरप्रेन्युअर्स अँड लीडर्स असोसिएशनच्या (स्वेला) अध्यक्षा म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत.






## खेड तालुक्यात कडकडीत बंद



**राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे अध्यक्ष व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मृत्यूनंतर सर्वत्र शोक व्यक्त होत आहे. खेड तालुक्यात देखील अनेकांनी हळहळ व्यक्त केली. खेड तालुका सर्वपक्षीय व राजगुरुनगर व्यापारी महासंघातर्फे गुरुवारी (दि. २९) कडकडीत बंद ठेवून उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. राजगुरूनगर शहरासह तालुक्यातील बाजारपेठा बंद ठेवण्यात आल्या. शहर बाजारपेठेसह सर्वदुर कडकडीत बंद पाळण्यात आला. त्यामुळे शहर परिसरातील रस्ते निर्मनुष्य झाले होते. शासनाने तीन दिवस दुखवटा व शासकीय सुट्टी जाहीर केल्याने अनेक शाळा, महाविद्यालये बुधवारी सोडण्यात आली तर गुरुवारीही सुट्टी देण्यात आली होती. शहरात रिक्षा वाहतुकीसह तुरळक वाहने दिसत होती. शहरातील सर्वच प्रकारची दुकाने बंद होती. केवळ मेडीकल स्टोअर्स सुरू होते. व्यापारी महासंघाचे स्वानंद खेडकर, विनय लोढा, माणिक होरे, नितिन शहा, प्रविण वायकर यांनी केलेल्या आवाहनाला व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत कडकडीत बंद पाळला.

## मासिक पाळीविषयी जनजागृती गरजेची

**(दै. आरंभ पर्व)**

मासिक पाळी ही स्त्रीच्या आरोग्याशी निगडित असलेली नैसर्गिक आणि महत्त्वाची शारीरिक प्रक्रिया आहे. तरीही आज अनेक समाजांमध्ये या विषयाकडे लाज, गैरसमज आणि अज्ञानाच्या नजरेने पाहिले जाते. या चुकीच्या समजुतींमुळे महिलांना शारीरिक, मानसिक आणि सामाजिक अडचणींचा सामना करावा लागतो. म्हणूनच मासिक पाळीविषयी जनजागृती करणे ही काळाची गरज आहे.

मासिक पाळी म्हणजे अपवित्रता, आजार किंवा लपवण्याची गोष्ट असा समज अजूनही अनेक ठिकाणी आढळतो. यामुळे मुली आणि महिलांना शाळा, काम, धार्मिक किंवा सामाजिक उपक्रमांपासून दूर ठेवले जाते. काही वेळा योग्य माहिती आणि स्वच्छतेच्या सुविधांचा अभाव असल्याने संसर्ग, अशक्तपणा आणि इतर आरोग्य समस्या उद्भवतात.



**शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे**

मासिक पाळीदरम्यान स्वच्छता राखणे अत्यंत आवश्यक आहे. स्वच्छ सॅनिटरी पॅड्स किंवा सुरक्षित पर्यायांचा वापर, वेळेवर बदल, स्वच्छ पाणी आणि योग्य विल्हेवाट याबाबत माहिती असणे गरजेचे आहे. योग्य मार्गदर्शन मिळाल्यास महिलांचे आरोग्य सुधारते आणि आत्मविश्वास वाढतो.

मासिक पाळीविषयी शालेय स्तरावर योग्य आणि वैज्ञानिक माहिती दिली पाहिजे. हा विषय केवळ मुलींपुरता मर्यादित न ठेवता मुलांनाही समजावून सांगणे आवश्यक आहे, जेणेकरून संवेदनशीलता आणि समजूतदारपणा वाढेल.

घरातही आई-वडील आणि पालकांनी मोकळेपणाने संवाद साधला पाहिजे.

मासिक पाळी हा विषय सामान्य मानून त्यावर खुलेपणाने बोलणे, महिलांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे आणि भेदभाव दूर करणे ही समाजाची जबाबदारी आहे. जनजागृती मोहिमा, आरोग्य शिबिरे आणि माध्यमांतून योग्य माहिती दिल्यास सकारात्मक बदल घडू शकतो.

मासिक पाळीविषयी जनजागृती केल्यास केवळ महिलांचे आरोग्यच सुधारत नाही, तर समानता, सन्मान आणि आत्मविश्वासही वाढतो. लाज आणि मौन दूर करून ज्ञान, स्वच्छता आणि सहानुभूतीचा मार्ग स्वीकारणे हाच खरा पुढचा टप्पा आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे




### छ. शिवाजी महाराजांच्या अष्टक्रांतीने स्वराज्य निर्मिती - पांडुरंग बलकवडे

राजगुरूनगर (आरंभ पर्व) : छत्रपती शिवाजी महाराजांनी कृषी क्रांती, सामाजिक क्रांती, अर्थ क्रांती, गनिमी काव्याची युद्ध क्रांती, आरमार क्रांती, गिरिदुर्ग आणि जलदुर्ग निर्मितीची क्रांती, भाषा-शुद्धी क्रांती आणि संस्कृतीच्या रक्षणाची सांस्कृतिक क्रांती करून हिंदवी स्वराज्य आणि सुराज्याची निर्मिती केल्याचे प्रतिपादन पांडुरंग बलकवडे यांनी केले. ते खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत शिवरायांची अष्टक्रांती या विषयावर बोलत होते. यावेळी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, सुरेश टाकळकर, व्याख्यानमाला समिती अध्यक्ष ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस.एस.पिंगळे, डॉ.एस.एस.जगताप, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी.दौंडकर, प्रबंधक एन.एम.शिंदे उपस्थित होते. पांडुरंग बलकवडे पुढे म्हणाले की, परकीयांच्या आक्रमणापासून भारताच्या संस्कृती, समाज आणि राष्ट्राचे रक्षण करण्याचे महान कार्य छत्रपती शिवाजी महाराजांनी केले. ते भारतीय संस्कृतीचे जीर्णोद्धारक आहेत. शिवरायांनी निर्माण केलेल्या राष्ट्रवादातून प्रेरणा घेऊन तानाजी मालुसरे, बाजीप्रभू देशपांडे यांनी आपल्या प्राणांचे बलिदान देऊन राष्ट्राचेही रक्षण केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य निर्मितीच्या महामार्गाला आदर्श मानून हिंदुस्तान गौरवशाली करण्यासाठी सर्वांनी कटिबद्ध व्हा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ज्योती वाळुंज, परिचय डॉ. कीर्ती नितनवरे, तर आभार विद्यार्थीनी अंजली बोंबले हिने मानले.

### ‘भाभीजी घर पर हैं! – फन ऑन द रन’ चित्रपटातील खास गाणे



मुंबई(आरंभ पर्व) : ‘भाभीजी घर पर हैं! – फन ऑन द रन’ हा आपले आवडले विश्व मोठ्या पडद्यावर घेऊन येण्यासाठी सज्ज होत असताना, चित्रपटाने आता आपल्या कथेला हृदय देणारे खास गाणे — ‘मनजोगी’ सादर केले आहे. सदैव मधुर आवाजासाठी ओळखले जाणारे सोनू निगम यांनी गायलेले हे रोमँटिक गाणे सौम्य, अंतरंग आणि मनाला शांत करणारे आहे. प्रेमाच्या सर्वात प्रामाणिक आणि निवांत भावनांना पकडणारी ही चाल, चित्रपटातील गोंधळ आणि विनोदामध्ये प्रेक्षकांना एक सुंदर, संगीतमय विराम देते. बॉर्डर 2च्या भावनिक तीव्रतेनंतर, ‘मनजोगी’मध्ये सोनू निगम हलक्या-फुलक्या आणि खेळकर सिनेमॅटिक विश्वाला आपला आवाज देताना दिसतात.

## रस्ते साफसफाई करण्याऱ्या स्वीपिंगयंत्र गाडीचे लोकार्पण

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

७७ वा भारतीय प्रजासत्ताक दिन राजगुरुनगर शहरात उत्साही वातावरणात साजरा झाला. शहराच्या वेशीवर व नगरपरिषद कार्यालयात प्रथम लोकनियुक्त नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच नगरपरिषदेने आरोग्य विभागासाठी घेतलेले शहरातील रस्ते साफसफाई करण्याचे नवीन स्वीपिंग यंत्र ( साफसफाई मशीन ) गाडीचे लोकार्पण नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ यांच्या हस्ते करण्यात आले



या स्वीपिंग मशीन गाडीमुळे शहरातील सर्व मुख्य रस्ते स्वच्छ होणार आहेत, असे यावेळी बोलताना मुख्याधिकारी अंबादास गर्कळ यांनी सांगितले. तसेच यावेळी राजगुरुनगर नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत प्राईडसिटी वाडा रोड आणि तिन्हेवाडी रोड तांबेवस्ती या ठिकाणी नवीन पाण्याची टाकी बांधली असून या टाक्यांच्या ठिकाणी कर्मचाऱ्यांसाठी बांधलेल्या वॉलमन रूमचे उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी उपनगराध्यक्ष मनोहर सांडभोर, नगरसेवक आश्विनी आवटे, सुप्रिया घुमटकर, फैज मोमीन, वैभव घुमटकर, मित्रसेन डोंगरे, कुमार सांडभोर, सचिन मधवे, सागर सातकर, निलेश घुमटकर, अमित घुमटकर आदी उपस्थित होते.

## आपल्या वाट्याचा देश घडवा - राहूल गिरी

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

सद्य:स्थितीत आपल्या देशासमोर अनेक समस्या असून प्रत्येकाने धर्म,जात, पंथ, वर्ण, लिंग यावर कोणताही भेदभाव न करता देशसेवेसाठी जिथे संधी मिळेल तेथे आपल्या वाट्याचा देश घडवा, असे आवाहन शिवव्याख्याते राहूल गिरी यांनी येथे केले. ते खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत कालचा वारसा, उद्याचा वारसदार - वर्तमान पिढीची जबाबदारी या विषयावर बोलत होते. या प्रसंगी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष



नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, सतीश नाईकरे, व्याख्यानमाला समिती अध्यक्ष ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस.एस.पिंगळे, डॉ.एस.एस.जगताप, उपप्राचार्य प्रा. व्ही.बी.दौंडकर प्रबंधक एन.एम.शिंदे उपस्थित होते.

## किंगकडून आगामी अल्बम ‘राजा हिंदुस्तानी’मधील ‘जो इश्क हुआ’ हे नवे गाणे प्रदर्शित

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

“मान मेरी जान” आणि “तु जाना ना पिया” सारख्या रोमँटिक हिट गाण्यांनी संपूर्ण पिढीला प्रेमात बुडवणारे पॉप स्टार किंग या लग्नसराईच्या हंगामात “जो इश्क हुआ” या आणखी एका गाण्यासह परत आला आहे. हे गाणे हृदयस्पर्शी असून नात्यांमध्ये उबदारपणा आणते आणि कायमच्या प्रेमाला समर्पित आहे. किंगने भावनिकदृष्ट्या प्रभावी गीतांना आठवणींमध्ये राहणाऱ्या सूरांसोबत मिसळून “जो इश्क हुआ” हे गाणे सादर केले आहे. हे सदाबहार आणि कायमचे प्रेम व्यक्त करणारे प्रेमगीत आहे. हे गाणे अशा नात्यांचा उत्सव साजरा करते जे आपल्याला आपल्या जोडीदाराशी असलेले नातं, त्यातील विश्वास आणि प्रेम व्यक्त करण्यास शिकवतो.

"जो इश्क हुआ" च्या म्युझिक व्हिडिओमध्ये लोकप्रिय अभिनेत्री श्रिया पिळगावकर आहे, जी किंगच्या आगामी अल्बम, राजा हिंदुस्तानीची झलक दाखवते.

जयपूरच्या राजेशाही परिसरात शूट केलेल्या जो इश्क हुआ' या म्युझिक व्हिडिओमध्ये लग्नाच्या थीमवर आधारित कथा दाखवली आहे, जी बालपणातील प्रेमापासून सुरू होऊन आयुष्यभर टिकणाऱ्या नात्यापर्यंत पोहोचते. पारंपरिक हळदी आणि वरमाला समारंभांच्या पार्श्वभूमीवर सेट केलेला हा व्हिडिओ शाळेच्या दिवसातील आठवणी आणि वर्तमानातील लग्नसोहळा एकत्र दाखवतो. गाण्याची सुरुवात हळुवारपणे होऊन ते एका भव्य, सिनेमॅटिक संगीतमय वातावरणात उलगडते.

गाण्याबद्दल बोलताना किंग म्हणाला, “जो इश्क हुआ हे खूप प्रामाणिकपणे तयार केलेले गाणे आहे. हे अशा प्रेमाचे प्रतीक आहे ज्याला घोषणा करण्याची गरज नाही, ते फक्त टिकून राहते. हे गाणं सौम्य, हृदयाला स्पर्श करणाऱ्या क्षणांपासून सुरु होऊन एका भव्य, प्रभावी आवाजात बदलते, जे प्रेमाची उब दाखवते. आम्हाला हे गाणं सिनेमॅटिक पण खासगी वाटावं असे हवे होतं, जे प्रत्येक खास क्षणासाठी योग्य असेल.”

अभिनेत्री श्रिया पिळगावकर म्हणाली, “मला नेहमीच किंगचे संगीत आणि त्यांची ऊर्जा आवडते. जयपूरमध्ये, विशेषत: एका राजवाड्यात शूटिंग केल्यामुळे कथेला एक सुंदर कालातीत अनुभव मिळाला. हे गाणं स्वतःमध्ये सौम्य, रोमँटिक आहे आणि त्यात मजबूत भावनिक संबंध आहे. ही एक प्रेमकहाणी आहे जी हळूहळू उलगडते आणि दीर्घकाळ लक्षात राहते. मला वाटते प्रेक्षकांनाही हे खूप आवडेल.” “जो इश्क हुआ” हे गाणे या हंगामात सर्वोत्तम लग्नाचे गाणे म्हणून रिलीज होत आहे, जे एक अविस्मरणीय प्रेमकहाणी साजरी करते. हे गाणं आता सर्व प्रमुख स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहे.



**थोडक्यात पण महत्वाचे**



## राष्ट्रीय चालक दिनानिमित्त 'सुगंधाचा वारसा' देऊन केले सन्मानित

**पुणे (आरंभ पर्व) :** भारतातील सर्वात मोठ्या अगरबत्ती उत्पादकांपैकी एक असलेल्या सायकल प्युअर अगरबत्तीच्या वतीने राष्ट्रीय चालक दिनानिमित्त देशभरातील चालकांना 'व्हाईब पॉवरबॅग एअर फ्रेशनर'चे वाटप करून त्यांचा सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एमएसआरटीसी), ओला कंझ्यूमर, व्हीआरएल, कर्नाटक राज्य मार्ग परिवहन महामंडळ (केएसआरटीसी), इंडियन फेडरेशन ऑफ ॲप-बेस्ड ट्रान्सपोर्ट वर्कर्स (आयएफएटी) आणि डीटीसी (दिल्ली ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन) यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबवण्यात आला. देशाची सेवा करणाऱ्या, प्रतिकूल परिस्थितीत आणि दीर्घकाळ काम करून प्रवाशांना त्यांच्या गंतव्यस्थानी पोहोचण्यास मदत करणाऱ्या चालकांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा असा हा एक हृदयस्पर्शी उपक्रम होता. चालकदिनानिमित्त सायकल प्युअरअगरबत्तीच्या वतीने मुंबई, बंगळूर, चेन्नई, हैदराबाद, दिल्ली, कोलकाता, पुणे, अहमदाबाद, लखनऊ आणि जयपूर या दहा शहरांमध्ये सुमारे १0 लाख 'व्हाईब पॉवर बॅग एअर फ्रेशनर' सॅशेचे वाटप करण्यात आले. या सहकार्याचा एक भाग म्हणून,सायकल प्युअर अगरबत्तीच्या वतीने केएसआरटीसी सोबत भागीदारी करून बंगळूर, म्हैसूर आणि मंगळूर विभागांतील त्यांच्या एसी प्रीमियम बसेसमध्ये 'व्हाईब पॉवर बॅग एअर फ्रेशनर' चेवाटप करण्यात आले. त्यातून चालक आणि प्रवासी दोघांनाही ताज्यातवान्या आणि सुखदायक प्रवासाचा अनुभव घेण्याची सुनिश्चिती त्यातून करण्यात आली.

## पेटीएमचा सलग तिसऱ्या तिमाहीत निव्वळ नफा ₹२२५ कोटींवर पोहोचला

**पुणे (आरंभ पर्व) :** पेटीएम (वन ९७ कम्युनिकेशन्स लिमिटेड), भारतातील एमएसएमई आणि मोठ्या उद्योगांना सेवा देणारी पूर्ण-स्टॅक व्यापारी पेमेंटमधील अग्रणी कंपनी, आणि एक अग्रगण्य वित्तीय सेवा वितरण कंपनी, तसेच मोबाइल पेमेंट, क्यूआर कोड आणि साउंडबॉक्सची प्रणेती, यांनी आज डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीचे (तिसरी तिमाही आर्थिक वर्ष २६) आर्थिक निकाल जाहीर केले. मजबूत मुद्रीकरण, उच्च पेमेंट जीएमव्ही, व्यापारी सबस्क्रिप्शन आणि वित्तीय सेवांच्या वितरणातून मिळणाऱ्या महसुलामुळे कंपनीने सलग तिसऱ्या तिमाहीत नफा नोंदवला आहे. डिसेंबर तिमाहीत, पेटीएमने ₹२२५ कोटींचा कर-पश्चात नफा (PAT) नोंदवला, जो मागील वर्षाच्या तुलनेत ₹४३३ कोटींनी अधिक आहे. या तिमाहीसाठी ईबीआयटीडीए ₹१५६ कोटींवर पोहोचला असून ईबीआयटीडीए मार्जिन ७% होता, जो महसूल वाढ आणि सततच्या ऑपरेटिंग लिव्हरेजमुळे मागील वर्षाच्या तुलनेत ₹३७९ कोटींची सुधारणा दर्शवतो. कॉन्ट्रिब्युशन नफा ₹१,२४९ कोटी होता, जो मागील वर्षाच्या तुलनेत ३०% जास्त असून कॉन्ट्रिब्युशन मार्जिन ५७% होता, ज्यात मागील वर्षाच्या तुलनेत ५ टक्के गुणांची सुधारणा झाली आहे.







# ऑनलाईन बेटिंग व गॅम्बलिंग ॲप्सवर कडक निर्बंधांची मागणी



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतामध्ये गेल्या काही वर्षांत ऑनलाईन बेटिंग, गॅम्बलिंग आणि फँटसी स्पोर्ट्स ॲप्सच्या माध्यमातून अब्जावधी रुपयांचे व्यवहार होत आहेत. या झपाट्याने वाढलेल्या उद्योगामुळे एका बाजूला मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होत असली, तरी दुसऱ्या बाजूला हजारो कुटुंबांचे आर्थिक व सामाजिक आयुष्य उद्ध्वस्त होत असल्याचे गंभीर वास्तव समोर आले आहे. कर्जबाजारीपणा, मानसिक नैराश्य, कौटुंबिक ताणतणाव तसेच आत्महत्यांचे वाढते प्रमाण ही याची भयावह परिणती ठरत आहे. या पार्श्वभूमीवर नागरिक सोशल फाउंडेशन, पुणे या संस्थेने या विषयावर सखोल अभ्यास करून महाराष्ट्र राज्य सरकार तसेच भारत सरकारच्या गृह मंत्रालय व माहिती-तंत्रज्ञान मंत्रालयाकडे अधिकृत निवेदन सादर केले आहे. निवेदनात ऑनलाईन बेटिंग, गॅम्बलिंग व फँटसी स्पोर्ट्स ॲप्सवर कठोर कायदेशीर निर्बंध आणण्याची तसेच प्रभावी अंमलबजावणी करण्याची ठोस मागणी नागरिक सोशल फाउंडेशनचे ॲड. सर्वेश मेहंदळे यांनी आज पत्रकार परिषदेत केली.

विविध राज्य सरकारांच्या नोंदी व राष्ट्रीय माध्यमांतील अहवालांनुसार, ऑनलाईन जुगाराच्या व्यसनामुळे देशभरात १०० ते १५० पेक्षा अधिक आत्महत्यांची प्रकरणे नोंदवली गेली आहेत. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या अंदाजानुसार, दरवर्षी सुमारे ₹१५,००० ते ₹२०,००० कोटी रुपयांचे थेट आर्थिक नुकसान भारतीय नागरिकांना या ॲप्समुळे सहन करावे लागत आहे. तपास यंत्रणांनी या प्लॅटफॉर्म्सचा वापर मनी लॉन्डरिंग, हवाला व्यवहार, आतंकवादी फंडिंग, मानव तस्करी व इतर समाजविघातक गुन्ह्यांसाठी होत असल्याचेही स्पष्ट केले आहे.

या पार्श्वभूमीवर नागरिक सोशल फाउंडेशन, पुणे या संस्थेने या विषयावर सखोल अभ्यास करून महाराष्ट्र राज्य सरकार तसेच भारत सरकारच्या गृह मंत्रालय व माहिती-तंत्रज्ञान मंत्रालयाकडे अधिकृत निवेदन सादर केले आहे. निवेदनात ऑनलाईन बेटिंग, गॅम्बलिंग व फँटसी स्पोर्ट्स ॲप्सवर कठोर कायदेशीर निर्बंध आणण्याची तसेच प्रभावी अंमलबजावणी करण्याची ठोस मागणी करण्यात आली आहे.

नामवंत सेलिब्रिटी व क्रीडापटू मोठ्या मोबदल्यात या ॲप्सचे प्रमोशन करत असल्यामुळे युवकांमध्ये या प्लॅटफॉर्म्सबाबत आकर्षण वाढले आहे. परिणामी विद्यार्थी, युवक आणि मध्यमवर्गीय कुटुंबे सर्वाधिक बाधित होत आहेत. त्यामुळे प्रस्तावित ऑनलाईन गेमिंग (प्रमोशन व रेग्युलेशन) कायदा हा केवळ कायदेशीर सुधारणा नसून, समाजाच्या आरोग्यासाठी व युवकांच्या भविष्याच्या संरक्षणासाठी अत्यावश्यक पाऊल ठरणार आहे.

यावेळी नागरिक सोशल फाउंडेशनचे अमेय सप्रे, प्रीतम थोरवे आदि मान्यवर उपस्थित होते.

### मुख्य मागण्या

- ऑनलाईन बेटिंग व गॅम्बलिंग ॲप्सवर कठोर व प्रभावी अंमलबजावणी
- सेलिब्रिटी प्रमोशनबाबत स्पष्ट नैतिक व सामाजिक जबाबदारी निश्चित करणे
- अशा ॲप्सचे वापरकर्ते व प्रवर्तक यांच्यावरही दंडात्मक तरतूद लागू करणे
- वारंवार उल्लंघन करणाऱ्यांसाठी अधिक कठोर शिक्षा व कारावासाची तरतूद
- महाराष्ट्र राज्यात ऑनलाईन बेटिंगविरोधात स्वतंत्र सायबर विभाग स्थापन करणे

## होरिबा इंडियाने स्वच्छ आणि स्मार्ट ऑटोमोटिव्ह सोल्यूशन्स केले सादर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रगत चाचणी आणि मापन तंत्रज्ञानातील जागतिक अग्रणी असलेल्या जपान-आधारित होरिबा ग्रुपची उपकंपनी असलेल्या होरिबा इंडिया ने, ऑटोमोटिव्ह उद्योगातील सर्वात प्रभावशाली जागतिक मंचांपैकी एक असलेल्या सिम्पोझियम ऑन इंटरनॅशनल ऑटोमोटिव्ह टेक्नॉलॉजी (SIAT) २०२६ मध्ये सहभाग घेऊन, स्वच्छ गतिशीलतेसाठी आपले भविष्य-सज्ज उपाययोजना सादर केल्या. होरिबा इंडियाने या कार्यक्रमात जागतिक कौशल्य आणि स्थानिक नाविन्यपूर्णतेचे प्रभावीपणे एकत्रीकरण करून, स्मार्ट आणि स्वच्छ गतिशीलतेला चालना देण्यासाठी आपले स्थान अधिक मजबूत केले. यावेळी त्यांनी आपले पहिले स्थानिक पातळीवर विकसित केलेले इलेक्ट्रोलायझर टेस्ट स्टेशन (एक स्वदेशी इलेक्ट्रोलायझर चाचणी प्लॅटफॉर्म जे कार्यक्षमता, कामगिरी, टिकाऊपणा वाढवते आणि हरित हायड्रोजन उत्पादनाचा खर्च कमी करते) सादर केले. आपल्या धोरणात्मक उद्दिष्टाचा पुनरुच्चार करत, होरिबा इंडिया ऑटोमोटिव्ह परिसंस्थेला प्रगत चाचणी आणि मापन तंत्रज्ञानाद्वारे सक्षम करत आहे, जे स्वच्छ उत्सर्जन, सुधारित ऊर्जा कार्यक्षमता आणि भविष्यातील नियामक चौकटींचे पालन करण्यास मदत करते.

## 'तेहरान' या चित्रपटाचा आज वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

रोमहर्षक कथा, दमदार ॲक्शन आणि थरारक गतीसह झी सिनेमावर 'तेहरान' या चित्रपटाचा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर शनिवार, 31 जानेवारी रोजी 1 वाजता होणार आहे. या चित्रपटात जॉन अब्राहमने त्याच्या सर्वात प्रभावी आणि ताकदीच्या भूमिकांपैकी एक असलेली भूमिका साकारली आहे. हृदयाची धडधड वाढवणाऱ्या ॲक्शन आणि उत्कंठावर्धक थराराने भरलेल्या या चित्रपटात एका भीषण बॉम्बस्फोटामागील दहशतवाद्यांचा शोध घेताना जॉन अब्राहम वेळेसोबत स्पर्धा करताना दिसतो, ज्यामुळे प्रेक्षक सुरुवातीपासून शेवटपर्यंत या चित्रपटाला खिळून राहतात.




अरुण गोपालन दिग्दर्शित या चित्रपटात जॉन अब्राहमसोबत मनुषी छिल्लर आणि नीरू बाजवा यांसारख्या कलाकारांचा समावेश आहे. त्यांच्या दमदार अभिनयामुळे कथेला अधिक खोली मिळते आणि चित्रपट अधिक रोचक बनतो.

जॉन अब्राहमने यात एसीपी राजीव कुमारची भूमिका साकारली आहे, जो परदेशी अधिकाऱ्यांना लक्ष्य करणाऱ्या दिल्लीतील भीषण बॉम्बस्फोटानंतर एका गुप्त मोहिमेवर निघतो. सुरुवातीला हल्ल्यामागील लोकांचा शोध घेण्याची मोहीम सुरू होते, पण लवकरच तो गुपित असलेले अजेंडे, बदलणारी निष्ठा आणि सीमापार कार्यरत असलेल्या गूढ शक्तींच्या जाळ्यात अडकतो. सत्याच्या जवळ जाताना राजीव एकाकी पडतो, कमी पडतो आणि त्याला एकट्यालाच काम करावे लागते. आणि जेव्हा त्याला वाटते की खरा सूत्रधार सापडला आहे, तेव्हाच मोहिम असे काही वळण घेते की सर्व काही बदलून जाते. रोमहर्षक कथा, दमदार ॲक्शन आणि थरारक वेगासह 'तेहरान' हा चित्रपट प्रेक्षकांना अविस्मरणीय अनुभव देणार आहे. झी सिनेमावर या चित्रपटाचा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर चुकवू नका शनिवार, 31 जानेवारी रोजी 1 वाजता.

# भारतीय सेनेचा बर्फावरील हॉकीत विजय

### चंदीगडने जिंकली मने; हरियाणा राज्याने पटकावले विजेतेपद, लडाख दुसऱ्या स्थानी

**लेह (लडाख) (दै. आरंभ पर्व)**



खेलो इंडिया विंटर गेम्स (KIWG) 2026 च्या उपांत्य फेरीत यजमान लडाखला 3-2 ने पराभूत करून चंदीगडचा पुरुष आइस-हॉकी संघ चर्चेचा विषय ठरला. प्रजासत्ताक दिनी एनडीएस (NDS) स्टेडियमवर पार पडलेल्या पुरुष गटाच्या आइस-हॉकी फायनलमध्ये, अनुभवी भारतीय सैन्यदलाला आपले सुवर्णपदक टिकवण्यासाठी चंदीगडच्या जिद्दी संघाविरुद्ध आपला पूर्ण अनुभव पणाला लावावा लागला. सैन्यदलाने हा सामना 3-2 अशा फरकाने जिंकला. सामन्याची शेवटची 3 मिनिटे शिल्लक असताना सैन्यदलाने विजयी गोल डागला. लडाख टप्प्यातील या खेळांचा यापेक्षा थरारक शेवट असूच शकला नसता. फिगर आणि आइस-स्केटर्सनी मिळवलेल्या 4 सुवर्णपदकांमुळे हरियाणाने 'क्विग' 2026 च्या लडाख टप्प्यातील सांघिक विजेतेपद पटकावले. लडाख, महाराष्ट्र आणि तेलंगणा या तिन्ही राज्यांनी प्रत्येकी 2 सुवर्णपदके जिंकली, परंतु रौप्य पदकांच्या संख्येमुळे त्यांच्या क्रमवारीत फरक पडला. लडाख (5 रौप्य), महाराष्ट्र (3 रौप्य) आणि तेलंगणा (2 रौप्य) यांनी पदक तालिकेत अनुक्रमे दुसरे, तिसरे आणि चौथे स्थान मिळवले. चंदीगडचे मुख्य प्रशिक्षक गौरव रहेजा म्हणाले, "माझ्या मते आम्हीच विजेते आहोत. हा खरोखरच एक अपवादात्मक अनुभव होता आणि देवाच्या कृपेने सर्व काही घडले. हा प्रवास आमच्यासाठी खूप महत्त्वाचा आहे. आम्ही पुढच्या वेळी अधिक कठोर परिश्रम, अधिक समर्पण आणि राज्य पातळीवर तसेच त्यापलीकडे ट्रॉफी जिंकण्यासाठी लढण्याचे वचन देतो." प्रजासत्ताक दिनी एनडीएस स्टेडियमवरील खेळांची सुरुवात 2000 मीटर 'शॉर्ट ट्रॅक मिक्स रिले हिट्स'ने झाली. या मिक्स रिलेमध्ये सर्वोत्तम स्पीड स्केटर्स रिंगणात उतरले होते. सहभागी सहा संघांची प्रत्येकी तीन याप्रमाणे दोन गटांत विभागणी करण्यात आली होती, ज्यातून सर्वोत्तम तीन संघ अंतिम फेरीसाठी पात्र ठरले.

## हिंदुस्तान झिंकने वेदांत मेटल बाजारात झिंक प्राइस केले लाँच

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनी, जगातील सर्वात मोठे एकात्मिक झिंक उत्पादक आणि जागतिक स्तरावरील पाच शीर्ष चांदी उत्पादकांपैकी एक असलेल्या हिंदुस्तान झिंक लिमिटेडने त्यांच्या प्रमुख मेटल ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म, वेदांत मेटल बाजारवर भारतीय रुपयांमध्ये झिंक प्राइस नावाचे लाइव्ह प्राइसिंग मॉड्यूल लाँच करण्याची घोषणा केली.

धातूच्या किंमतींच्या प्रवेशाचे लोकशाहीकरण करण्यासाठी डिझाइन केलेले, झिंक प्राइस भारतातील व्यवसायांना, विशेषतः एमएसएमई आणि लहान-खंड खरेदीदारांना, जागतिक बेंचमार्कच्या अनुषंगाने भारतीय रुपयांमध्ये पारदर्शक, रिअल-टाइम धातूच्या किमती पाहण्यास, बुक करण्यास आणि लॉक करण्यास सक्षम करते, जे हिंदुस्तान झिंकची अधिक समावेशक, डिजिटली सक्षम आणि स्वावलंबी औद्योगिक परिसंस्था तयार करण्याच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे.

२०२२ मध्ये सुरू झालेले वेदांत मेटल बाजार हे भारतातील पहिले ऑनलाइन मेटल मार्केटप्लेस आहे, जे धातू खरेदी प्रक्रिया सुलभ आणि आधुनिक करण्यासाठी डिझाइन केलेले आहे. हे प्लॅटफॉर्म एक अखंड डिजिटल अनुभव देते जे ग्राहकांना थेट किंमती पाहण्यास, ऑर्डर देण्यास आणि संपूर्ण पारदर्शकतेसह एंड-टू-एंड व्यवहार व्यवस्थापित करण्यास अनुमती देते. देशभरातील हजारो व्यवसायांचा विश्वास असलेले, वेदांत मेटल बाजार देशात धातूंच्या स्रोतांमध्ये बदल घडवून आणण्यात एक महत्त्वपूर्ण शक्ती म्हणून उदयास आले आहे.

# जोटून इंडियाने सुरु केले आहे जोटाशील्ड इटरना, प्रिमियम एक्स्टिरिअर पेंट्समध्ये रचला एक नवा मापदंड

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जगात पेंट आणि कोटिंग्ज उद्योगात आघाडीवर असलेल्या संस्थेचे स्थानिक अंग असणाऱ्या जोटून इंडियाने आज जोटाशील्ड इटरनाच्या उद्घाटनाची घोषणा केली, जे तिच्या प्रिमियम एक्स्टिरिअर पेंट पोर्टफोलिओमधील एक क्रांतिकारी अभिनव उत्पादन आहे. भरवशाच्या जोटाशील्ड छत्राखाली सर्वोच्च गुणवत्ता देणारे इटरना एक्स्टिरिअर पेंट संदर्भातील रंग उडून जाणे, धूळ साचणे ते पावसाच्या पाण्यामुळे डाग पडणे अशा मुख्य आव्हानांवर तोडगा काढते; यासाठी ते एका प्रगत स्वयं-स्वच्छताकारी वैशिष्ट्याचा वापर करते ज्यामुळे भिंती दीर्घकाळ नव्याने रंगवल्यासारख्या दिसत राहतात. जोटूनच्या संशोधन व विकास (आर अँड डी) टीम्सकडून घडवण्यात आलेले जोटाशील्ड इटरना प्रगत स्वयं-स्वच्छताकारी तंत्रज्ञान, श्रेष्ठ बाइंडर यंत्रणा आणि बदलत्या हवामानात स्थिर राहणाऱ्या रंगांचा मेळ साधून दीर्घकाळ टिकणारे संरक्षण आणि सौंदर्य पुरवते, अगदी भारतातील आव्हानात्मक हवामानातील परिस्थितींमध्येसुद्धा. स्मूद फिनिश असणारे जोटाशील्ड इटरना पेंट फिल्ममधून धूळ आत शिरू देत नाही, जी समस्या पारंपरिक पेंट्स उष्णतेमुळे आणि आर्द्रतेमुळे मऊ झाल्यावर सर्वसाधारणपणे पाहायला मिळते. याच्या स्वयं-स्वच्छताकारी गुणधर्मांमुळे धूळ पावसात निघून जाते, आणि पावसाच्या पाण्याच्या ओघोळांमुळे डागही पडत नाहीत, ज्यामुळे बाहेरच्या भिंती जास्त काळ स्वच्छ आणि उजळ राहतात. 500 रंगांमध्ये उपलब्ध असणारे इटरना त्यामधील क्रियाशील संरक्षक पदार्थांसह (ॲडिटिव्ह्जसह) रंगांची अतुलनीय कामगिरी दाखवते जे अतिनील किरणांशी दीर्घकाळ संपर्क आल्याने उत्पन्न होणाऱ्या फ्री रॅडिकल्सवर मात करून पेंट जुने दिसण्याच्या प्रक्रियेचा वेग मंदावते. या उत्पादनावर प्रचंड चाचण्या झालेल्या असून जागतिक त्रयस्थ प्रयोगशाळांकडून त्याला 21 गुणवत्ता आश्वासन प्रमाणपत्रे मिळालेली आहेत, ज्यांमध्ये CO2, विसरण, QUV मुळे जलद गतीने होणारी झीज, पाणी आत झिरपणे, क्षार फवारणीचा प्रतिकार, या चाचण्यांचाही समावेश होतो. 12 वर्षांच्या कामगिरीची वॉरंटी लाभलेले जोटाशील्ड इटरना वारंवार पुन्हा रंग देण्याची गरज लक्षणीय प्रमाणात कमी करते, ज्यामुळे घरमालकांना, कंत्राटदारांना आणि विकासकांना दीर्घकाळ मूल्यप्राप्ती होते. उद्घाटनाच्या वेळी बोलताना, जोटून इंडिया प्रा. लि. चे व्यवस्थापकीय संचालक, शशी कुमार वेणुगोपाल म्हणाले, "भारतीय एक्स्टिरिअर्सना हवामानाच्या टोकाच्या परिस्थितींचा सामना करावा लागतो, उदा. प्रखर ऊन, मुसळधार पाऊस, आर्द्रता, आणि प्रचंड धूळ, ज्या सर्वांचा रंगवलेल्या पृष्ठभागावर परिणाम होत असतो. जोटाशील्ड इटरनासह, आपण जोटूनचे जागतिक कौशल्य आणि सखोल स्थानिक माहिती एकत्र आणून एक असे एक्स्टिरिअर पेंट तयार केले आहे जे खऱ्या अर्थाने टिकून राहते. हा प्रश्न फक्त अधिक चांगल्या संरक्षणापुरता नाही, तो ग्राहकांना मनाची शांती देण्याचासुद्धा आहे - रंग टिकणारा, धुळीचा प्रतिकार करणाऱ्या आणि वर्षानुवर्षे नव्याने रंगवल्यासारख्या दिसणाऱ्या भिंती. इटरना आजतागायतचे आमचे सर्वात प्रिमियम एक्स्टिरिअर उत्पादन आहे आणि हे भारताला अभिनवतेच्या बळावर उच्च कामगिरी करणारे उपाय मिळवून देण्याची जोटूनची दीर्घकालीन कटिबद्धता अधोरेखित करते." या क्षेत्रातील एक आघाडीची उद्योजक असणारी जोटूना नि:शेष गुणवत्ता आणि सातत्यपूर्ण अभिनवता यांचा मेळ साधून तिच्या जागतिक नेटवर्कच्या बळावर, कठोरपणे चाचणी केली जाणारी, खऱ्या आयुष्यात कामगिरी देणारी आणि स्थानिक बाजाराच्या गरजा पुरवणारी, उत्पादने विकसित करत राहते. जोटून इंडियाच्या विपणन (मार्केटिंग) प्रमुख माधवी मराठे म्हणाल्या, "सध्या सुंदर दिसतील आणि टिकूनही राहतील अशा एक्स्टिरिअर पेंट्सची नितांत गरज आहे. सौंदर्य टिकवायचे असेल तर त्यासाठी फक्त रंग पुरेसा नसतो, त्यासाठी अशी उत्पादने घडवावी लागतात जी टोकाच्या हवामानाचाही सामना करू शकतात. आमच्या स्वानुभवावर बेतलेल्या स्थानिक माहितीचा आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून, आम्ही धुळीचा शिरकाव न होऊ देणारा, वापरातील सुलभतेचा आणि रंगाच्या सर्वाधिक कामगिरीचा एक नवा औद्योगिक पायंडा रचला आहे.




दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.